४. ज्या विद्यार्थ्यांचे पालक शहरात प्रत्यक्ष राहतात, नोकरी धंदा करतात, परंतु त्यांच्या नावे गावी शेत जमीन आहे अशा विद्यार्थ्यांना

या परीक्षा शुल्क माफीमुळे होणारा खर्च विहित कार्यपध्दतीनुसार भागविणे आवश्यक राहील.

वरील सूचना आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या तात्काळ निदर्शनास आणण्यात याव्यात.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/ईबीसी/2018/ 25
दिनांक :- - 4 JAN 2019

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय तंत्रनिकेतन, अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था , नागपूर विभाग,
नागपूर .

सदरहू विषयांन्वये शासन पत्रात नमुद केल्यांप्रमाणे आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

(गुलाबराव ठाकरे)
**सहसंचालक,**
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

महत्वाचे

क्रमांक: २अ/एडीएम/२०१८/१४२८
दिनांक : 6 NOV 2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर.

**विषय :-** तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अभ्यासक्रमांकरिताचे विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत...

**संदर्भ :** शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१८/ प्र.क्र.३८१/ तांशि-४, दिनांक ५.११.२०१८

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७,दिनांक २३.१०.२०१८ अन्वये राज्यातील सन २०१८ च्या खरीप हंगामातील Trigger-२ लागू झालेल्या१८० तालुक्यांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. त्याकरिता काही सवलती लागू करण्यास शासनाने मंजूरी दिली असून शालेय /महाविद्यालयीन परीक्षा शुल्कात माफी ही सवलत अंतर्भूत आहे.

त्यानुसार सदर शासन निर्णयान्वये राज्यातील सन २०१८ च्या खरीप हंगामातील Trigger-२ लागू झालेल्या१८० तालुक्यातील जे विद्यार्थी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील विविध अभ्यासक्रमांकरिता प्रवेशित झाले असतील अशा विद्यार्थ्यांचे संबंधित विद्यापीठाचे/महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे चालू शैक्षणिक वर्षातील परीक्षा शुल्क माफ करण्यात यावे असे शासनाने संदर्भाधीन दिनांक ५.११.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित केलेले आहेत.

- ही परीक्षा शुल्क माफीची योजना राज्याचा अधिवासी असलेल्या व रुपये ८.०० लाख या मर्यादेपर्यंत कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा असलेल्या विद्यार्थ्यांकरिता लागू राहील.
- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना या योजनेअंतर्गत ५०% परीक्षा शुल्क अनुज्ञेय असल्याने विद्यार्थ्यांना केवळ ५०% परीक्षा शुल्क माफी अनुज्ञेय राहील.

ही सवलत खालील विद्यार्थ्यांना लागू असणार नाही......

१. ज्या विद्यार्थ्यांना शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १०० टक्के परीक्षा माफीची सवलत उपलब्ध आहे.
२. जे विद्यार्थी त्याच परीक्षेस दुस-यांदा बसले असतील.
३. जे विद्यार्थी बहिस्थ (External)म्हणून नोंदले असतील.

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
९१८०

तालुक्यातील तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अभ्यासक्रमांकरीताचे विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३८१/तांशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०५ नोव्हेंबर, २०१८

संदर्भ : १) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक एफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दिनांक १८/११/१९९३
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७, दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक शुल्क-५२१८/प्र.क्र.४१३/मशि-२, दिनांक ३ नोव्हेंबर, २०१८

**प्रस्तावना :-**

संदर्भ क्र.२ येथील महसूल व वन विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक २३/१०/२०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सन २०१८ च्या खरीप हंगामातील Trigger-२ लागू झालेल्या १८० तालुक्यांमध्ये दुष्काळ सदृष्य परिस्थिती जाहिर करण्यात आली आहे. त्याकरीता काही सवलती लागू करण्यास शासनाची मंजूरी देण्यात आली आहे. या सवलतीमध्ये शालेय/महाविद्यालयीन परीक्षा शुल्कात माफी, ही एक सवलत अंतर्भूत आहे.

**शासन निर्णय-**

महसूल व वन विभागाच्या दिनांक २३/१०/२०१८ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या आदेशानुसारतंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अभ्यासक्रमांकरीता विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याकरीता शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

(१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७, दिनांक २३/१०/२०१८ अन्वये राज्यातील सन २०१८ च्या खरीप हंगामातील Trigger-२ लागू झालेल्या १८० तालुक्यातील जे विद्यार्थी तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील विविध अभ्यासक्रमांकरीता प्रवेशित झाले असतील अशा विद्यार्थ्यांचे संबंधित विद्यापीठाचे/महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे चालू शैक्षणिक वर्षातील परीक्षा शुल्क माफ करण्यात यावे.

(२) ही परीक्षा शुल्क माफीची योजना राज्याचा अधिवासी असलेल्या व रुपये ८.०० लाख या मर्यादेपर्यंत कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा असलेल्या विद्यार्थ्यांकरीता लागू राहिल.

(३) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना या योजनेंतर्गत ५०% परीक्षा शुल्क अनुज्ञेय असल्याने विद्यार्थ्यांना केवळ ५०% परीक्षा शुल्क माफी अनुज्ञेय राहील.

(४) ही सवलत खालील विद्यार्थ्यांना लागू असणार नाही-

अ) ज्या विद्यार्थ्यांना शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १०० टक्के परीक्षा शुल्क माफीची सवलत उपलब्ध आहे.

ब) जे विद्यार्थी त्याच परीक्षेस दुसऱ्यांदा बसले असतील .

क) जे विद्यार्थी बहिस्थ (External) म्हणून नोंदले असतील.

ड) ज्या विद्यार्थ्यांचे पालक शहरात प्रत्यक्ष राहतात, नोकरी-धंदा करतात, परंतु त्यांच्या नांवे गावी शेत जमिन आहे अशा विद्यार्थ्यांना

(५) या परीक्षा शुल्क माफी मुळे होणारा खर्च विहित कार्यपध्दतीनुसार भागवणे आवश्यक राहिल.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८११०५१६५०४२५७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay A. Dharurkar

Digitally signed by Sanjay A. Dharurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2, cn=Sanjay A. Dharurkar
Date: 2018.11.05 18:16:58 +05'30'

**(संजय औ. धारुरकर)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४) कुलगुरु, सर्व विद्यापीठे
५) कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.मागणगांव, जि.रायगड
६) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
७) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
८) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण, मुंबई, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई
९) सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)

१०) सर्व जिल्हाधिकारी
११) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
१२) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
१३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१५) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१७) अवर सचिव (तांशि-३/ विशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) कक्ष अधिकारी (मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
१९) सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
२०) निवडनस्ती/तांशि-४.